# UGC Journal Details

| | |
|---|---|
| **Name of the Journal :** | Research Journey |
| **ISSN Number :** | |
| **e-ISSN Number :** | 23487143 |
| **Source:** | UNIV |
| **Subject:** | Marathi |
| **Publisher:** | Swatidhan International Publication |
| **Country of Publication:** | India |
| **Broad Subject Category:** | Multidisciplinary |

Print

KVN Naik Arts, Commerce & Science College, IQAC OFFICE

Co-ordinator
I.Q.A.C.
KVN Naik Arts, Commerce
& Science College, Canada Corner,
Nashik-422 002.

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
quality higher education for all



# UGC Approved List of Journals

|| Home (journal_list.aspx) ||

You searched for r

**Total Journals : 1436**

Show 25 entries Search: Research journey

| View | Sl.No. | Journal No | Title | Publisher | ISSN | E-ISSN |
|---|---|---|---|---|---|---|
| **View (ugc_admin_journal_report.aspx?eid=NDA3MDU=)** | 1168 | 40705 | Research Journey International E Research Journal | Swatidhan Pub. Yevla | | 23487143 |
| **View (ugc_admin_journal_report.aspx?eid=NDQxMTc=)** | 1220 | 44117 | Research Journey | Swatidhan International Publication | | 23487143 |

Showing 1 to 2 of 2 entries (filtered from 1,436 total entries) Previous 1 Next

## For UGC Officials

> e-Office (https://ugc.eoffice.gov.in/acl_users/credentials_cookie_auth/require_login?came_from=https%3A//ugc.eoffice.gov.in/)
> NIC mail (https://mail.gov.in/iwc_static/c11n/allDomain/layout/login_gov2.jsp?lang=en&3.0.1.2.0_15121607&svcs=abs,im,mail,smime,calendar,c11n)
> RTI online (https://rtionline.gov.in/RTIMIS/login/index.php)
> PG portal (https://pgportal.gov.in)

Naik Arts, Commerce & Science College, KVN ★ IQAC OFFICE

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February-2019 Special Issue – 140

## Application of Language Skills

**Guest Editor:**
**Dr. P. V. Rasal**
**Principal,**
**MVP Samaj's Arts, Commerce & Science College,**
**Tryambakeshwar, Dist. Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editor of the issue:**
**Prof. Samadhan Gangurde**
**Prof. Madhav Khalkar**
**Dr. S. J. Nikam**
**Dr. Chhaya Shinde**
**Mr. Dipak Gangurde**

**Chief Editor:**
**Dr. Dhanraj Dhangar (Yeola)**

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 800/-

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013) | February-2019
Special Issue 140- Application of Language Skills
UGC Approved Journal


## Editorial Board

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)**
**Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)**
**Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)**
**Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)**

**Co-Editors -**

- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik.
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Dr. Samjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.]**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.]**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.]**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.]**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.]**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.]**

**Advisory Board -**

- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**

- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali ,** HOD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.


**Published by –**
**© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

'RESEARCH JOURNEY' *International E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 140- Application of Language Skills
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

## INDEX



| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | The Importance of Soft Skills for Graduating and Post- Graduating Populace | Dr. P.V.Rasal | 05 |
| 2 | Language Learning and Language Acquisition | Dr. Anjali Kulkarni | 09 |
| 3 | The Exigent Areas for the Indian Learners of English | Dr. Manisha Suryavanshi | 12 |
| 4 | Some Observations on a book on Speaking Skills Entitled Teaching Speaking : A Holistic Approach | Dr. S. J. Nikam | 17 |
| 5 | Developing Reading Skills of English Language | Dr. S. J. Ghotekar | 20 |
| 6 | Types of Listening Skills in Learning of English Language | Dr. Vivek Jawale | 25 |
| 7 | Basic Learning Skills in the English Language | Dr. Dipali Raju More | 31 |
| 8 | Importance of Listening Skill | Dr. Bhagyashree Athwale | 36 |
| 9 | The Role of Language Skills in English Language Learning | Smt. Shashwati Nirbhavane | 41 |
| 10 | Developing Language Skills : LSRW | Taterao Nikalje | 44 |
| 11 | Challenges of Rural Students in English Language Acquisition | Prof. K.L. Shinde | 47 |
| 12 | Yoga Practice and Language Learning | Amol Tisge | 51 |
| 13 | Developing Skills: Reading and Writing | Dipak Baviskar | 53 |
| 14 | Errors and Remedies in Reading English of the Tribal Students Studying in 7th Std. of Vani Region | Mr. Dnyaneshwar Nikam | 56 |
| 15 | The Significance of Integrated Approach in the Teaching of English Language | Dr. P. P. Parmar | 59 |
| 16 | Developing Skills in Listening and Speaking | Sameer Pawar | 62 |
| 17 | जनसंचार माध्यम और भाषा कौशल | डॉ. अनंत केदारे, डॉ.मोतीलाल भोरगा | 65 |
| 18 | द्वितीय भाषा अधिगम की प्रक्रिया में भाषाई कौशलों की भूमिका | श्रीमती प्रिया कदम | 68 |
| 19 | भाषिक कौशल : स्वरूप एव संकल्पना | डॉ. योगेश दाणे | 73 |
| 20 | अध्ययन-अध्यापन में सुधार लाने के लिए सूचना प्रौद्योगिकी की भूमिका | डॉ. गीता परमार | 79 |
| 21 | भाषा और भाषिक कौशल का उपयोजन | प्रा. समाधान गांगुर्डे | 83 |
| 22 | हिंदी भाषा और भाषा कौशल | प्रा. युवराज गातवे | 87 |
| 23 | हिंदी भाषा और भाषा कौशल | प्रा. नंदादेवी बोरसे | 89 |
| 24 | हिंदी कविता अध्ययन-अध्यापन के कौशल | डॉ. जगदीश परदेशी | 93 |
| 25 | हिंदी भाषा और भाषा कौशल | डॉ. भारती धोंगडे | 100 |
| 26 | भाषा कौशल में लेखन कौशल का महत्त्व | डॉ. संजय जाधव | 102 |
| 27 | भाषिक सर्जनशीलता – स्वरूप और महत्त्व | प्रा. राजेंद्र जाधव | 108 |
| 28 | हिंदी और भाषा कौशल | डॉ. विजय वाघ | 112 |
| 29 | भाषा कौशल में भाषण कौशल का विकास | प्रा. संदीप तपासे | 116 |
| 30 | ज्ञानरचनावाद भाषिक कौशल का विकास | सागर चौधरी | 119 |
| 31 | भाषिक कौशल्ये | डॉ. शिरीष लांडगे | 125 |
| 32 | भाषिक कौशल्यांचे उपयोजन | डॉ. शांताराम चौधरी | 127 |
| 33 | अनुवाद क्षेत्रातील महत्त्वाच्या संधी | डॉ. प्रकाश शेवाळे | 133 |
| 34 | भाषिक कौशल्यांचे संगणकीय उपयोजन | डॉ. राजेंद्र सांगळे | 139 |

| | | | |
|---|---|---|---|
| 35 | भाषिक कौशल्यांचे उपयोजन | प्राचार्य डॉ. वेदश्री थिगळे | 144 |
| 36 | मराठी भाषेतील कौशल्ये | प्रा. माधव खालकर | 149 |
| 37 | सूत्रसंचालन - एक प्रभावी कला | प्रा. नारायण पाटील | 154 |
| 38 | मुलाखत लेखन आणि भाषिक कौशल्ये | डॉ. शरद थोरात | 157 |
| 39 | भाषिक कौशल्य- मुलाखत | डॉ.विठ्ठल केदारी | 161 |
| 40 | भाषिक कौशल्य आणि करिअरच्या संधी | डॉ. गीतांजली चिने | 163 |
| 41 | भाषण :एक कला | डॉ. छाया शिंदे | 168 |
| 42 | भाषिक कौशल्ये -काळाची गरज | डॉ.अशोक भवर | 172 |
| 43 | भाषिक कौशल्य वाचन : स्वरूप, महत्त्व व उपयोजन | राहुल पाटील | 178 |
| 44 | भाषिक कौशल्ये आणि उपयोजन | डॉ. दत्तात्रय फलके | 182 |
| 45 | मराठी साहित्यातील एक माध्यम – भाषांतर | डॉ. देविदास शिंदे | 185 |
| 46 | मुलाखत लेखन | प्रा. बलराम कांबळे | 188 |
| 47 | व्यक्तिमत्व विकास व भाषिक कौशल्ये एक दृष्टीक्षेप | प्रा.विठ्ठल जाधव | 191 |
| 48 | भाषिक कौशल्य विकासातून ज्ञान व अर्थप्राप्ती | प्रा.महेश बनकर | 195 |
| 49 | भाषांतर आणि सारांशलेखन | प्रा. शालिनी पाटील | 199 |
| 50 | भाषिक कौशल्ये | प्रा. शिवाजीराव पाटील | 202 |
| 51 | भौगोलिक पर्यावरणासाठी, भाषिक कौशल्यांचा होणारा उपयोग | प्रा. शरद धट | 205 |
| 52 | भाषिक कौशल्ये आणि व्यक्तिमत्व विकास | डॉ.सुजाता गडाख | 208 |
| 53 | व्यक्तिमत्व विकासामधील मूलभूत भाषिक कौशल्यांचे स्थान | श्रीमती. नीता पुणतांबेकर | 212 |
| 54 | अशाब्दिक संज्ञापन | प्रा. प्रवीण गोळे | 216 |
| 55 | प्रसारमाध्यमांतील जाहिरातीसाठी आवश्यक भाषिक कौशल्ये | प्रा.वैशाली जाधव | 220 |
| 56 | मराठी भाषेतील कौशल्ये | शुभांग घोटेकर | 224 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013) | February-2019
Special Issue 140- Application of Language Skills
UGC Approved Journal

# भाषिक कौशल्यांचे संगणकीय उपयोजन

डॉ.राजेंद्र सांगळे
के.व्ही.एन.नाईक महाविद्यालय, नाशिक

**प्रास्ताविक :**

भारत हा बहुभाषिक लोकांचा देश आहे. भारतातील घटक राज्यांची निर्मिती सुद्धा भाषेवर आधारित असून त्या त्या राज्यात तेथील प्रमुख भाषेबरोबरच अनेक बोलीभाषेतून दैनंदिन भाषिक व्यवहार पार पाडला जातो. " सर जॉर्ज ग्रिअर्सनच्या लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया (१९०३-१९२३) नुसार भारतात त्या काळात १७९ भाषा आणि ५४४ बोली अस्तित्वात होत्या. १९६१ च्या जनगणनेनुसार १६५२ भाषा भारतात बोलल्या जात होत्या. जी भाषा दहा हजारांपेक्षा जास्त संख्येच्या जनसमूहांमध्ये बोलली जात असेल, त्याच भाषेचा जनगणनेमध्ये मातृभाषा म्हणून समावेश करण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला. त्यामुळे भारतीय भाषांची नेमकी संख्या आजही उपलब्ध नाही. भाषा धोक्यात आलेल्या देशांमध्ये भारत प्रथम क्रमांकावर असून १९८ भारतीय भाषा मृत्यूपंथावर आहेत. असा इशारा युनेस्कोने दिला आहे." [5] अशावेळी भाषेचे संवर्धन आणि तिचे जतन ही महत्वाची गोष्ट असून कोणत्याही भाषेचे अस्तित्व आणि तिचा विकास हा ती भाषा बोलणाऱ्या लोकांच्या संख्येवर आणि त्या भाषेचे व्यवहारात कसे आणि किती प्रभावी उपयोजन केले जाते त्यावर अवलंबून असते. बोलणाऱ्या लोकांची संख्या लक्षात घेता मराठी ही जगातील १९ व्या क्रमांकाची भाषा आहे. मात्र ज्ञानव्यवहाराच्या क्षेत्रात तिचे उपयोजन फारच कमी क्षेत्रात दिसून येते, ललित साहित्य आणि प्रशासनातील तिचा अल्प वापर हे अपवाद वगळता जागतिक स्तरावर मराठीचे व्यवहारिक व उपयोजित महत्व सिद्ध करण्यास आपण( सर्व मराठी भाषिक समूह) अजून पुरेसे सज्ज नाहीत किंवा त्यात म्हणावे तसे यश आपल्या प्रयत्नांना येत नाही. "अमेरिकेतील डायनीयल एब्राम या गणिती तज्ज्ञाच्या मतानुसार जी भाषा, ती बोलणाऱ्या समाजास व्यवसाय देऊ शकत नाही ती भाषा तो समाज सोडून देण्याचा प्रयत्न करतो. एब्राम यांच्या अंदाजाप्रमाणे 21 व्या शतकाच्या अखेरीपर्यंत संपूर्ण जगात ३०० भाषा अस्तित्वात राहू शकतात. जगात आज अस्तित्वात असणाऱ्या सहा हजारांहून अधिक बोलीभाषांपैकी निम्म्या भाषा या कायमच्या नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. असा निष्कर्ष २००९ मध्ये नोंदविला आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेनंतर जगातील भाषांच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे. मानवजातीच्या वाटचालीमधील संपन्न भाषिक वारसा नष्ट होण्यामुळे मानवी संस्कृती, बौद्धिक संपदा, कला, ज्ञान, शहाणपण वगैरेंचा ठेवा या जगाच्या पाठीवरून कायमचा नाहीसा होणार आहे."[6] एकूणच जागतिकीकरणात आपली भाषा घेऊन टिकायचे असेल तर भाषेचे व्यवहारातील उपयोजन हे महत्वाचे ठरते. त्यासाठी बदलत्या काळाची पाऊले आणि गरज ओळखून पारंपारिक भाषिक कौशल्यांना तंत्रज्ञानाची जोड देऊन मराठीभाषेचा जाणीवपूर्वक विकास करणे हे पुढील काळासाठी आपल्या सर्व मराठी भाषिक समुहाचे महत्वाचे उद्दिष्ट असले पाहिजे.

---

[5] डॉ.शिंदे अरुण,दैनिक सकाळ, ई-आवृत्ती, मंगळवार २७ फेब्रुवारी २०१८. https://www.esakal.com/citizen-journalism/esakal-citizen-journalism-dr-arun-shinde-article-marathi-language-100205

[6] .शिंदे अरुण,दैनिक सकाळ, ई-आवृत्ती, मंगळवार २७ फेब्रुवारी २०१८. https://www.esakal.com/citizen-journalism/esakal-citizen-journalism-dr-arun-shinde-article-marathi-language-100205

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 140- Application of Language Skills
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

श्रवण, वाचन, लेखन आणि भाषण ही महत्वाची अशी चार भाषिक कौशल्ये आहेत. यापैकी श्रवण आणि वाचन ही दोन कौशल्ये घेणारी असून उर्वरित दोन ही देणारी कौशल्ये आहे. पहिल्या दोन कौशल्यांच्या आधारे मानव बहुश्रुत होत असतो तर त्यानंतर उर्वरित कौशल्यांचा वापर करून त्यातील सर्जनशीलता फुलत असते. शालेय जीवनापासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत आपण विविध कौशल्ये आत्मसात करीत असतो. पुढे नोकरी किंवा व्यवसायाच्या निमित्ताने आपल्याला ह्या कौशल्यांचे व्यवहारात प्रत्यक्ष उपयोजन करावे लागते. व्यवहारात नोकरी आणि उद्योगाच्या क्षेत्रात अशा कौशल्याधिष्टीत मनुष्यबळाची प्रचंड आवश्यकता असते. अशावेळी कौशल्यांचे केवळ पुस्तकी ज्ञान असून चालत नाही तर प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी त्या त्या कौशल्यांचा अत्यंत खुबीने, कुशलतापूर्वक आपल्याला वापर करणे आवश्यक असते. मराठी भाषेतील महाविद्यालयीन पातळीवर शिकत असलेल्या मराठी भाषेतील वरीलकौशल्यांचा व्यवहारात कोणकोणत्या क्षेत्रात उपयोग अथवा उपयोजन करता येईल याचे विवेचन प्रस्तुत शोधनिबंधात करण्याचा प्रयत्न केला आहे.

महाविद्यालयीन पातळीवर शिक्षण घेत असतांना विद्यार्थाचा विविध विषयांशी संपर्क येतो. अभ्यासक्रमाच्या रचनेनुसार काही विषय हे सामान्य पातळीवर तर काही विशेष विशेषस्तरावर अभ्यासावे लागतात. विषय कोणताही असला तरी एखाद्या विद्यार्थ्याने भाषिक कौशल्ये जर चांगल्या प्रकारे आत्मसात केले असतील तर त्याचा पहिला फायदा त्याला परीक्षेच्या वेळी विविध विषयांच्या प्रश्नाची उत्तरे सोडविताना होत. विषय कोणता असला तरी परीक्षा पद्धतीत अचूक व नेमकी उत्तरे लिहिणे महत्वाचे असते. आशावेळी भाषिक कौशल्ये ज्ञात असलेल्या विद्यार्थ्याला विषयाचे प्राथमिक ते दुय्यम पातळीवरील आकलन जलद गतीने होते आणि त्या आकलन झालेल्या ज्ञानाची त्या विषयातील महत्वपूर्ण आशयाची नेमक्या शब्दात अचूक आणि तर्काधीष्टीत मांडणी करता येते. मूल्यमापन प्रक्रियेत गुणदानाच्या दृष्टीने अशा मांडणीला खूप महत्व असते. श्रवण आणि वाचन या कौशल्याचे उपयोजन करून विद्यार्थी चांगल्या प्रकारे ज्ञान आत्मसात करू शकतो तर लेखन कौशल्याचे साह्याने परीक्षेत या ज्ञानाचे उपयोजन करू शकतो. काही विषयांना मोखिक परीक्षा अनिवार्य असते. अशावेळी त्याला भाषण कौशल्याचा उपयोग होतो. बऱ्याच वेळा आपण बघतो की अत्यंत सामान्यस्वरूप असलेल्या अशा मोखिक परीक्षेत विद्यार्थ्यांना स्वतःविषयी नेमकेपणाने चार ओळी सांगता येत नाही. आशयासाहित येत असलेया ज्ञानासहित व्यक्त होता येत नाही. हाच प्रकार पुढे नोकरी साठी लेखी परीक्षा किंवा मुलाखत देतांना होतो. साधारणपणे स्पर्धा परीक्षांची तयारी करताना भाषिक कौशल्ये खूप उपयुक्त ठरतात. निबंध लेखन, महत्वाच्या घटनेवर स्वताचे मत नोंदवायचे असेल तर अशावेळी शैली इतरांपेक्षा वेगळी ठरते. स्पर्धेच्या या युगात विद्यार्थ्यांना भाषिक कौशल्यांचा आयुधासारखा वापर होऊ शकतो.

एकविसावे शतक हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जाते. या काळात जीवनाच्या आणि व्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रचंड प्रभाव आपल्याला दिसून येतो. अशावेळी तंत्रज्ञानाला भाषिक कौशल्यांची जोड दिल्यास व्यवहार गतिमान आणि सुलभपणे पार पडण्यास निश्चितपणे उपयोग होईल. या बाबतील भाषिक कौशल्यांचे संगणकीय उपयोजन हा अत्यंत महत्वाचा विषय असून त्यात पारंगत असलेल्या विद्यार्थ्याला विकासाच्या अनेक संधी उपलब्ध आहे. आपला कुठलाही जीवनव्यवहार संगणकाशिवाय पूर्ण होत नाही. पूर्वी संगणक आणि मराठी भाषा यांचा फारसा संबंध नयेत नव्हता. भाषेच्या क्षेत्रात संगणकाचा वापर हि अभावानेच आढळणारी गोष्ट होती. मात्र आज संगणकामुळे भाषिक क्रांती होऊन जगातील सर्व प्रादेशिक भाषाव्यवहार नियंत्रित आणि गतिमान करण्याचे काम संगणकामुळे सहज शक्य झाले आहेत. मानवाच्या भौतिक व बौद्धिक जीवनात अमुलाग्र परिवर्तन करणाऱ्या संगणकाचा संपूर्ण समाजजीवनावर मोठा प्रभाव आहे. भाषिक कौशल्यांचे संगणकावर प्रभावी उपयोजन करण्यासाठी पारंपारिक

ISSN : 2348-7143
February-2019

कौशल्यांच्या जोडीलाच काही आधुनिक आणि तांत्रिक कौशल्ये आपणास आत्मसात करावी लागतात. त्याची थोडक्यात चर्चा पुढे केली आहे.

**युनिकोड –भाषिक वरदान :**

पूर्वी इंग्रजी भाषा वगळता इतर प्रादेशिक भाषांनमधून संगणकावर काम करताना मोठी अडचण निर्माण व्हायची. कारण प्रत्येक भाषेची लिपी हि वेगळी असल्याने Font हि खूप मोठी अडचण संगणकाच्या माध्यमातून होणाऱ्या भाषिक व्यवहारावर यायची. २००५ पर्यंत संगणकावर किंवा माहितीच्या महाजालावर मराठी सहित भारतातील इतर कोणत्याही प्रादेशिक भाषा त्यांच्या लिपीमध्ये वापरता येत नव्हत्या. त्यासाठी ठराविक असे काही महागडे Software विकत घ्यावी लागायची. शिवाय आशा Software ची स्वतःची आशी प्रणाली असायची जी अत्यंत क्लिष्ट आणि गुंतागुंतीची असायची. अशावेळी संबंधित Software मधील कळफलक वापरायला खूपच अडचण व्हायची. काही ठराविक लोकांना फक्त याचा वापर करता येत असे. सामान्य मराठी भाषक किंवा विद्यार्थी यांना हा सगळा व्यवहार मोठा अडचणीचा होता. युनिकोडच्या अगोदार किरण भावे यांनी १९९९ मध्ये किरण हा ध्वन्याधारित टंक विकसित करून थोडी सुलभता आणली होती. शिवाजी सारखा टंकही याच स्वरूपाचा होता. मात्र या सर्वांवर मोठी मर्यादा होती. हे सर्व टंक संगणकावर जाणीवपूर्वक कार्यान्वित करावे लागत तेव्हाच ते काम करीत. मात्र ध्वन्याधारित (फोनेटिक) अशा युनिकोडच्या शोधामुळे या क्षेत्रात प्रचंड क्रांती झाली. पूर्वी ज्या Font मध्ये मजकूर असेल तो Font संगणकावर नसेल तर तो मजकूर दिसायचा नाही. मात्र युनिकोड ने हि अडचण दूर केली. टंकाबाबतची तांत्रिक समानता आणणे म्हणजे युनिकोड होय. C-Dac आणि Microsoft ने मंगल नावाचा पहिला युनिकोड Font विकसित केला आणि आपल्या भाषा व्यवहाराला मोठाच हातभार लावला. संगणक आणि भाषेच्या विश्वात जागतिकीकरणाची नवी परिभाषा Microsoft ने युनिकोडच्या माध्यमातून रुजविली. देवनागरी लेखन प्रक्रियेला एका छताखाली आणण्याचे काम युनिकोडमुळे शक्य झाले. विंडोजच्या प्रत्येक जुन्या आणि सुधारित कार्यप्रणालीत युनिकोड चा प्रभावी वापर करता येतो. संगणकावर मराठी मजकुराचे लेखन करणे आणि सहज तो मजकूर इंटरनेट वरून दुसरीकडे पाठविणे सहज शक्य झाले. सोपे झाले. त्यामुळे भाषा विकासातील तांत्रिक अडचणी बऱ्यापैकी दूर झाल्या.

संगणकावर लेखन करण्यासाठी आपणास विविध साधनांचा आधार घ्यावा लागतो. यासाठी बाजारात तयार अशा आज्ञावल्या उपलब्ध आहेत. कधी कधी काही प्रकाशन आणि प्रसारमाध्यमांमध्ये काम करणाऱ्या व्यवसायिक संस्था आपल्या सोयीने अशा आज्ञावल्या विकसित करून घेतात. आज जगभारत संगणकावर लेखन करण्यासाठी सर्वात लोकप्रिय software म्हणून Microsoft च्या Wordचा वापर केला जातो. सहज उपलब्धता आणि वापरायला सुलभ या वैशिष्ट्यामुळे ही प्रणाली अल्पावधीतच लोकप्रिय ठरली असून युनिकोडचा प्रभावी व अचूक वापर यात अगदी सहजपणे करता येतो. त्यामुळे मराठीत लेखन करणे सोपे होते. Word शिवाय Adobe ची अनेक उत्पादने बाजारात उपलब्ध आहे. विशेषतः जाहिरात आणि प्रकाशन विश्वात ही उत्पादने वापरली जातात. यात पेजमेकर, कोरल, इन-डिझाईन अशा प्रनाल्यांचा समावेश होतो.

**भाषिक कौशल्ये आणि संगणकीय उपयोजन –**

यामुळे भाषिक कौशल्यांचे विशेषतः लेखन कौशल्याचे संगणकीय उपयोजन खूप सोपे झाले आहे. आहे. प्रत्येक कार्यालयात आणि व्यवसायात E-mail म्हणजेच इलेक्ट्रोनिक पत्र हे खूप महत्वाचे ठरत आहे. अशावेळी पूर्वी फक्त एका ठराविक भाषेतच ई-मेल पाठवता येत. त्यामुळे मराठी भाषेच्य वापरावर खूप मर्यादा येत. मराठीसह इतर प्रादेशिक भाषेतील संगणकाच्या क्षेत्रातील भाषिक व्यवहार त्यामुळे खुजा वाटत. एक

न्युनत्वाची भावना त्यामुळे निर्माण होत. भाषेच्या क्षेत्रातील हि कमीपणाची भावना आज दूर झाली आहे. आज आपण अगदी सहजपणे संगणकाचा वापर करून मराठी भाषेतून देवनागरी लिपीत इलेक्ट्रोनिक टपाल ( ई-मेल) पाठवू शकतो. तसेच संगणकाच्या सहायाने इंटरनेट वर आपली स्वतःची अनुदिनी (ब्लॉग) तयार करून वेगवेगळ्या विषयावर अभिव्यक्त होऊ शकतो. आपले लेखन कौशल्ये, आपल्यातील सर्जनशीलता पप्रगट करण्यासाठी आता पुस्तक प्रकाशित करेपर्यंत वाट पाहता ब्लॉग च्या माध्यमातून आपण वाचकांशी थेट जोडले जातो. त्यांनी नोंदविलेला चांगला वाईट प्रतिसाद आपण पाहू शकतो. त्यानुसार आपल्या लेखन तंत्रात आणि शैलीत सुधारणा करू शकतो. अशाच प्रकारे भाषिक कौशल्यांचा वापर करून आपण फेसबुक, whatsapp या सारख्या प्रभावी अशा नवसमाजमाध्यमांवर आपले विचार, मते, ललित साहित्य याचे लेखन करू शकतो. तेथेही एकाचवेळी आपण अनेक वाचकांशी आपल्या स्वतःला जोडून घेत असतो. त्यांच्या प्रतिसादाची नोंद घेता येते. फक्त यासाठी आपल्या भाषिक कौशल्यांना थोडी तंत्राची जोड आपल्याला द्यायला यायला हवी. येथेही लेखन कौशल्यासाठी आवश्यक असणाऱ्या गतीला , मांडणीला महत्व आहेच.

'लिहिणाऱ्याच्या हेतुनुसार वाचणाऱ्याच्या तयारीप्रमाणे होणारे अर्थाचे आकलन'[7] म्हणजे वाचन होय. तंत्रज्ञानाच्या या युगात वाचानाचेही स्वरूप बदलले आहे. ई –बुक, ई-वर्तमान पत्र आल्याने भाषा हा कागद आणि पुस्तकापुरता मर्यादित न राहता त्याचे स्वरूप व्यापक झाले आहे. आज संगणकावर कुठलेही वर्तमानपत्र आपणास इंटरनेटच्या द्वारे सहज उपलब्ध होत आहे. तसेच किंडल आणि विविध कंपन्यांच्या ई-बुक रिडर तसेच मोबाईलच्या माध्यमातून आपणास अनेक ई-बुक उपलब्ध आहे. शिवाय सामाजिक माध्यमावर ही भरपूर असा वाचनीय मजकूर उपलब्ध आहे. अशावेळी या बदलत्या साधनाच्या अनुषंगाने आपणास आपली वाचन कौशल्ये विकसित करणे गरजेचे वाटते. वाचन प्रक्रियेतील शब्दबोध, वाचनदिशा, पुनर्दृष्टीक्षेप, दृष्टीचा आवाका, आकलन, आस्वादन, शब्दसंग्रह या घटकांना येथेही खूप महत्व असते. या नवमाध्यमांच्या सहायाने आपण आपला वेळ वाचवू शकतो. शिवाय अत्यंत कमी जागेत खूप सारी माहिती, पुस्तके आपण एका छोट्याशा उपकरणात सहजपणे साठवू शकतो. वाचन कौशल्याचा उपयोग केल्यास हे वाचनही मनाला आनंद देणारे आणि आपल्या ज्ञानात भर टाकणारे ठरू शकेल.

संगणकाचा उपयोग करून आपण आपले भाषण कौशल्याचे अधिक प्रभावीपणे उपयोजन करून शकतो. संगणक आणि मोबाईल ही दृक-श्राव्य माध्यमे आहेत. आज जगातील सर्वात जास्त लोक इंटरनेटच्या माध्यमातून या साधनांशी जोडली गेली आहे. युट्यूब सारख्या प्रणालीमुळे आज जगातील कुठल्याही प्रकारचे ज्ञान आपण घरी बसून मिळवू शकतो. अशा प्रकारची माहिती देणारी अनेक स्वतंत्र अशी चॅनल आज युट्यूब वर उपलब्ध आहेत. तुमच्यात जर चांगले संभाषण कौशल्ये असेल तर तुम्ही अशा प्रकारचे तुमचे स्वतःचे चॅनल तयार करून तुम्ही पारंगत असलेल्या विषयाच्या वेगवेगळ्या व्हिडियो तयार करून लोकांना उद्बोधन करू शकतात, अवघड विषय शिकवू शकतात. तुम्हाला माहित असलेली माहिती गरजू लोकांपर्यंत पोहोचवू शकतात. शिवाय यात चांगल्या प्रकारची आर्थिक कमाई सुद्धा होते. शिवाय येथेही तुम्ही एकाचवेळी अनेक लोकांशी स्वतःला जोडून घेऊ शकतात. जोडलेलं लोक तुमच्या व्हिडियोला चांगला वाईट प्रतिसाद नोंदवू शकतात. त्यामुळे संभाषण कौशल्याचा उपयोग करून तुम्ही या आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहायाने स्वतःची वेगळी ओळख निर्माण करू शकतात. शिवाय करियर म्हणूनही या क्षेत्रात विद्यार्थी चांगले यश मिळवू शकतात.

मुक्त ज्ञानकोश असलेला विकिपीडिया आज सगळ्या भाषांमध्ये उपलब्ध आहे. सहजपणे एखादी संकल्पना अथवा घटना याविषयी माहिती घ्यायची असल्यास जगभरातील लोक विकिपीडियाचा वापर करतात. विकिपीडिया हा मुक्त ज्ञानकोश असून त्यासाठी कोणतेही आर्थिक शुल्क वापरकर्त्यांकडून आकारले

[7] डॉ.खिरे उषा, मायगावकर अंजली, 'वाचन आणि लेखन कौशल्ये', यच.म.मु.वि.प्रकाशन, नाशिक , प्रथम आवृत्ती-२०००, पृ.क्र.३

जात नाही. तसेच येथे माहितीत भर टाकणाऱ्या , ती संपादित करणाऱ्या लेखकांना सुद्धा कुठलेही मानधन अथवा आर्थिक मोबदला मिळत नाही. भाषिक बांधिलकीच्या माध्यमातून जगभरातील त्या त्या भाषेतील लेखक , कलावंत आणि आपल्या भाषेवर प्रेम करणारे विद्यार्थी , जाणकार हे काम निरपेक्षपाने करीत असतात. मराठीतही विकिपीडिया वर अनेक चांगली व उपयुक्त माहिती आढळून येते. मात्र आजूनही इतर भाषांच्या तुलनेत सगळ्या क्षेत्राचे ज्ञान आपण विकिपिडीयावर टाकू शकलो नाही. जी माहिती सध्या आहे ती फारच त्रोटक स्वरूपात आहे किंवा एकेरी पद्धतीची आहे. सविस्तर आणि तपशीलासह माहिती विकिपिडीयावर अभावानेच आढळते. त्यामुळे तिच्या विश्वासार्हतेबद्दल वापरकर्त्यांच्या मनात शंका उपस्थित होऊ शकते. अशावेळी आपण सर्वांनी भाषिक कौशल्यांचा प्रभावी उपयोग करून योग्य ते विषय निवडून त्यांची तपशीलवार व संदर्भासह मांडणी विकिपिडीयावर करणे गरजेचे आहे. आपल्या सर्वांच्या प्रयत्नातून या मुक्त ज्ञानकोशावरील मराठी भाषा आणीतिच्यातील ज्ञानव्यवहार समृद्ध होण्यास निश्चितपणे मदत होईल. राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीने राज्यातील शाळा-महाविद्यालयांमध्ये विधार्थी आणि शिक्षकांसाठी विकिपीडियाच्या विशेष कार्यशाळांचे आयोजन करण्यासाठी भरीव असे आर्थिक अनुदान व मदत दिली जाते. कौशल्यांच्या संगणकीय उपयोजनात विकिपीडिया हा सुद्धा एक अत्यंत महत्वाचा घटक आहे. आपण सर्वांनी या विषयाकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे वाटते.

आज महाजालावर अनेक संकेतस्थळे आपल्याला दिसून येतात. यातील बरीच संकेतस्थळे ही मराठी भाषेतून दिसून येतात. वैयक्तिक माहितीपासून ते शासनाच्या विविध योजनांची माहिती देणारी ही संकेतस्थळे विद्यार्थी आणि सामान्य नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त असतात. अशा संकेतस्थळांच्या विकासप्रक्रियेत भाषिक कौशल्यांचे उपयोजन करून ती संकेतस्थळे आणि त्यातील आशय जास्तीत जास्त चांगला व उपयुक्त करता येतो. त्यात वैविध्य आणता येते.

अशाप्रकारे आजच्या या तंत्रयुगात आपण भाषिक कौशल्यांचे संगणकीय उपयोजन करून ज्ञानभाषा आणि व्यवहारभाषा म्हणून मराठी भाषेच्या विकासास हातभार लावू शकतो.